## -: प्रेसनोट दिनांक- ०६/१०/२०२३ :-

**आरोपी लोकसेवक राजीव शामराव जाधव,वय- वर्षे, पद-पोलीस हवालदार ब.नं.३२२, वर्ग ३ नेमणूक चंदगड पोलीस ठाणे,जि.,कोल्हापूर. सध्या रा.धोंडीराम पाटील यांचे घरी भाडयाने साधाना कॉलेजमागे काजुबाग गल्ली ,ता. गडहिंग्लज,जि.कोल्हापूर. मुळ गाव. रा.भावैश्वर मंदिर जवळ कौलगे, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर रा. भावैश्वर मंदिर जवळ कौलगे ,ता.गडहिंग्लज,जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत....**

---

तकारदार हे व्यवसायाने व्यापारी आहेत. ते सध्या कोल्हापूर येथे वास्तव्यास आहेत. त्यांचे मूळ गांव दाटे,ता. चंदगड,जि.कोल्हापूर आहे. ते मूळ गांवी गेले असताना त्यांचेवर तसेच त्यांची आई श्रीमती लक्ष्मी कानुरकर व भाचा पुंडलीक शंकर खरूजकर यांचेवर त्यांचे शेजारी सौ संजना खरूजकर यांनी तकार दिलेने दि.३०/०७/२०२३ रोजी चंदगड पोलीस ठाणे येथे मारहाणीचा गुन्हा दाखल झाला सदर गुन्हयाचा तपास चंदगड पोलीस ठाणे येथेल पोलीस हवालदार राजीव जाधव यांचेकडे असल्याने त्यांनी तकारदार व त्यांची आई व भाचा यांना दिनांक ३१/०७/२०२३ रोजी चंदगड पोलीस ठाणेत बोलावून घेवुन नोटीस दिली व दिवसभर पोलीस ठाणेत बसवुन ठेवले त्यावेळी पोलीस जाधव यांनी तुम्हाला गुन्हयामध्ये अटक करायची नसेल, गुन्हयामध्ये वाढीव कलम लावायचे नसेल व तपासात मदत करायची असेल तर ५०००/-रू दयावे लागतील असे तकारदार यांना सांगीतले. त्यामुळे दि.०१/०८/२०२३ रोजी तकारदार यांनी अँन्टी ब्युरो,कोल्हापूर कार्यालयाकाडे चंदगड पोलीस ठाणेचे पोलीस हवालदार जाधव हे लाच मागत असलेबाबत तकार दिली.

तकारदार यांचे तकारीप्रमाणे दि.०२/०८/२०२३ रोजी दोन पंचासमक्ष चंदगड पोलीस ठाणे,जि.कोल्हापूर येथील पोलीस राजीव जाधव यांचे लाच मागणीची पडताळणी केली असता एकंदरीत पडताळणी कारवाईमध्ये पोलीस राजीव जाधव यांनी किती देणार असे विचारल्याने तकारदार यांनी ४५००/-रू.देतो असे सांगीतले असता दे आण जा लवकर मला वेळ लावत बसु नको असे म्हणून तकारदार यांचेवर दाखल असलेल्या गुन्हयामध्ये अटक न करणे तसेच गुन्हयामध्ये वाढीव कलम न लावता गुन्हयाचे तपास कामात मदत करण्यासाठी तकारदार सुनिल कानुरकर यांचेकडे तडजोडीअंती ४५००/-रू.लाच रक्कम मागीतलेचे निष्पन्न झाले.

आरोपी लोकसेवक राजीव शामराव जाधव,वय-४४, वर्षे, पद-पोलीस हवालदार ब.नं.३२२, वर्ग ३ नेमणूक चंदगड पोलीस ठाणे,जि.,कोल्हापूर.सध्या रा.धोंडीराम पाटील यांचे घरी भाडयाने साधाना कॉलेजमागे काजुबाग गल्ली ,ता. गडहिंग्लज,जि.कोल्हापूर. मुळ गाव. रा.भावैश्वर मंदिर जवळ कौलगे, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर यांचेविरुध्द चंदगड पोलीस ठाणे, जि. कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रकिया सुरु आहे.

सदरची कारवाई मा.श्री. अमोल तांबे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मा.श्री विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री. सरदार नाळे, पोलीस उपअधीक्षक, संजीव बंबरगेकर,पोलीस उपनिरीक्षक, पोहेकॉ/९८३ विकास माने, पोहेकॉ/१४८० सुनिल घोसाळकर, पोना/२०६१ सचिन पोना/२००९ संदीप काशिद, पोकॉ/४७४रूपेश माने पोकॉ/२६०८ उदय पाटील, अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**
**२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**
**३)श्री.सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९६७३५०६५५५, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**
**४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक :- १०६४. ५)व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**